सामुहिक प्रोत्साहन योजनेच्या कार्यनियमावलीमध्ये सुधारणा
पात्रता कालावधीत बंद पडलेल्या घटकांकडून विक्रीकर माफी
अंतर्गत उपभोगलेली प्रोत्साहने वसूल करणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
शासन निर्णय क्रमांक : साप्रोयो २०१०/प्र.क्र.९१/उद्योग-८
दिनांक : १२ जुलै,२०१०

वाचा : १) शा.नि. उ, ऊ व का वि. क्रमांक : आयडीएल ७०७९/९५२२७/(२५४०)/उद्योग-८,
दि.११.८.१९८०
२) राज्यस्तरीय समितीच्या दि.२६.२.२०१० रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त

## शासन निर्णय :

सामूहिक प्रोत्साहन योजनेची कार्यनियमावली संदर्भाधीन शासन निर्णय क्र.१ दि. ११/८/१९८० नुसार निश्चीत करण्यात आली आहे.या कार्यनिंमावलीतील परिच्छेद ११.१० व ११.११ नुसार उद्योग घटक त्याच्या कार्यकालावधीत ७ वर्षांच्या आत बंद पडल्यास व्याजासह व ७ वर्षानंतर बंद पडल्यास व्याजाशिवाय उपभोगलेल्या प्रोत्साहनाच्या वसुलीस पात्र आहे. सा.प्रो.यो. कार्यनियमावलीतील या नियमात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार राज्यस्तरीय समितीच्या ९ व्या बैठकीत याबाबत समितीने खालील निर्णय घेतला आहे.

ज्या उद्योग समुहाचे संबधीत उद्योग घटकाव्यतिरिक्त (बंद उद्योग ) इतर उद्योग घटक चालू आहेत, अशा उद्योग समुहाचे घटक वगळता पात्रता कालावधीत बंद पडलेल्या घटकांकडून विक्रीकर माफी (exemption) सह उपभोगलेलीं प्रोत्साहने बंद कालावधीच्या प्रमाणात वसूल करण्यात यावीत. (उदा. उद्योग घटकचा कार्य कालावधी १० वर्ष असेल, उद्योग घटकाने रु.५० लाखाची प्रोत्साहने उपभोगली असतील आणि घटक ७ वर्ष पूर्ण झाल्यानंतर बंद पडला असेल तर अशा उद्योग घटकाकडून - घटकाने उपभोगलेली प्रोत्साहने रु.५० लाख /घटकाचा कार्यकालावधी १० वर्ष X घटकाचा उर्वरीत कार्यकालावधी ३ वर्ष - रु.१५ लाख वसूल करण्यात यावेत. ) राज्यतरीय समितीच्या या निर्णयास शासनाने मान्यता दिली आहे.

२. सदर शासन निर्णय हा वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारीक संदर्भ क्र.१३/कराधान-१/२०१० दिनांक १४/५/२०१० नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. हा शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०१००७१३१२२९५९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(दा.अ.कुलकर्णी )
शासनाचे अवर सचिव

प्रत:-

विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई,
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
विक्रीकर आयुक्त, विक्रीकर भवन, माझगांव, मुंबई.